**बालकांचा मोफत व सक्तीच्या**
**<u>शिक्षणाचा अधिकार अधिनियम-२००९</u>**
**इ.१ली ते ८ वी तील अनुत्तीर्ण झालेल्या**
**विद्यार्थ्यांना पुढील वर्गात प्रवेश**
**देण्याबाबत व त्यांची संपादणूक पातळी**
**वाढविण्याबाबत.**

# महाराष्ट्र शासन
## शालेय शिक्षण विभाग

शासन निर्णय क्र. पीआरई-२०१०/(प्र.क्र.२९१)/प्राशि-१
मंत्रालय विस्तार भवन मुंबई -३२
दिनांक १६ जून, २०१०

**वाचा :** १) बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम-२००९.
२) शासन परिपत्रक क्र. विकाक-२००९/प्र.क्र.२९२/प्राशि-१,दि.१० मे,१०.
३) शासन निर्णय क्र.पीआरई २०१०/प्र.क्र.२१५/प्राशि-१,दि. ११ जून,१०

**<u>प्रस्तावना:-</u>**

१. केंद्र सरकारने सन २००२ च्या ८६ व्या संविधान विशोधन अधिनियमान्वये अनुच्छेद २१ (अे) मध्ये प्राथमिक शिक्षणाच्या मूलभूत अधिकाराचा समावेश केला आहे. त्यानुसार सहा ते चौदा वयोगटातील सर्व बालकांना मोफत व सक्तीचे शिक्षण देणारा अधिनियम, Right of Children to Free and Compulsory Education Act, २००९ (No. ३५, २००९), केंद्र शासनाने पारित करून तो भारत सरकारच्या २७/०८/२००९ च्या राजपत्रात प्रसिद्ध केला आहे. तसेच, भारत सरकारच्या दिनांक १६/०२/२०१० च्या राजपत्रात सदर अधिनियम दिनांक ०१/०४/२०१० पासून संपूर्ण भारतात (जम्मू व काश्मिर वगळता) लागू केला असल्याचे नमूद केले आहे.

२. समता, सामाजिक न्याय, लोकशाही आणि मानवी समाजामध्ये न्यायाची प्रस्थापन ही मूल्ये, सर्व मुलांच्या प्राथमिक शिक्षणाच्या माध्यमातून साधली जाऊ शकतात. यादृष्टीने हा अधिनियम अंमलात आणला आहे. त्यामुळे सहा ते चौदा वयोगटातील सर्व बालकांना मोफत व सक्तीचे प्राथमिक शिक्षण पुरविण्याची, त्यांना शाळांमध्ये प्रवेश देण्याची, उपस्थितीची आणि प्राथमिक शिक्षण पूर्ण करण्याची जबाबदारी शासनाने स्वीकारली आहे.

**शासन निर्णय :-** शासन परिपत्रक, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग क्र.विकाक-२००९/प्र.क्र.२९२/प्राशि-१, दि. १० मे, २०१० अन्वये बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम २००९, दिनांक १ एप्रिल २०१० पासून लागू करण्यात आला असल्याचे सूचित केले आहे. त्यानुसार सन २००९-१० या शैक्षणिक वर्षात इ.पहिली ते आठवीतील ज्या विद्यार्थ्यांना शाळांनी अनुत्तीर्ण घोषित केले आहे, त्या सर्व विद्यार्थ्यांना शाळांनी सन २०१०-११ या शैक्षणिक वर्षात पुढील वर्गात प्रवेश देण्यात यावा. तसेच अनुत्तीर्ण किंवा कोणत्याही कारणास्तव बालकांना शाळेतून काढून टाकता येणार नाही, असे नमूद केले आहे. अशा शाळांकडून अनुत्तीर्ण दर्शविण्यात आलेल्या विद्यार्थ्यांची संपादणूक ज्या विषयामध्ये समाधानकारक नसेल त्या विषयातील त्यांची संपादणूक अपेक्षित पातळीवर आणण्यासाठी खालीलप्रमाणे सूचना देण्यात येत आहेत -

१) त्या-त्या इयत्तांमध्ये अपेक्षित अध्ययन क्षमता प्रत्येक विद्यार्थी संपादित करील याबाबतची जबाबदारी संबंधित शिक्षक / विषय शिक्षक / मुख्याध्यापक व शाळा यांची राहील.

२) सन २००९-१० च्या निकालपत्रातील गुणांवरुन अनुत्तीर्ण दर्शविण्यात आलेल्या विद्यार्थ्यांची ज्या विषयाची संपादणूक पातळी समाधानकारक नाही त्या विषयांच्या उत्तरपत्रिका (चाचण्या व सत्र परीक्षा) अभ्यासाव्यात. त्यावरुन विद्यार्थ्यांच्या संपादणूकीतील उणिवा असलेल्या घटकांची यादी करावी.

३) विद्यार्थ्यांशी चर्चा करुन प्रतिसादामधील चुकांबाबत नेमक्या अडचणी, उणिवा आणि त्यामागील कारणांचा शोध घ्यावा. त्याआधारे विद्यार्थ्यांच्या संपादणूकीमधील अडचणी, त्रुटी, उणिवा दूर करण्यासाठी कालबद्ध नियोजन करावे.

४) संपादणूक कमी असण्याची संभाव्य कारणे पुढीलप्रमाणे असू शकतात.

- अध्ययन अनुभव न मिळणे / अपुरा मिळणे.
- "संकल्पना" न समजणे / अंशत: समजणे.
- संबोधांबाबत गैरसमज होणे.
- संबोध / संकल्पना / कौशल्ये यामधील एखादी पायरी न समजणे / विसरणे.

* संबंधित घटकाचे पूर्वज्ञान नसणे / अपुरे असणे.
* मूलभूत क्षमता अप्राप्त असणे / त्यावर प्रभुत्व नसणे. (लेखन, वाचन, गणन, मुलभूत क्रिया)
* प्रश्नांचा अर्थ न कळणे, उत्तरासाठी वेळ न पुरणे, प्रतिसाद देताना घाई करणे.
* अध्यापन प्रक्रियेतील निरसता.
* विद्यार्थी आणि शिक्षकांमधील सुसंवादाचा अभाव.
* मानसिक समस्या आणि ताणतणाव.

२. <u>उपाययोजना</u> :

* अध्ययन अध्यापन प्रक्रिया आनंददायी ठेवावी.
* शिक्षकांनी पालक व विद्यार्थी यांच्याशी चर्चा करुन विद्यार्थ्यांमधील उणिवांचा शोध घ्यावा.
* अध्ययन झाल्यानंतर पुरेसा अध्ययन सराव घ्यावा.
* अपेक्षित संपादणूक झाल्याची खात्री करण्यासाठी वारंवार पडताळणी करावी.
* अपेक्षित संपादणूक प्राप्त होईपर्यंत विद्यार्थ्यांना सातत्याने मार्गदर्शन करावे.

२) उणिवा व त्रुटी दूर करण्यासाठी संबंधित विद्यार्थ्यांना वैयक्तिक / छोट्या गटात शाळा सुरु होण्यापूर्वी किंवा शाळा सुटल्यानंतर आवश्यकतेनुसार मार्गदर्शन करावे. कोणत्याही परिस्थितीत त्या-त्या इयत्तांमध्ये अपेक्षित अध्ययन क्षमता प्रत्येक विद्यार्थी संपादित करील याची खात्री करावी. अशी संपादणूक आढळून न आल्यास संबंधित शिक्षक / मुख्याध्यापक व शाळा यांच्याविरुद्ध कारवाई करण्यात येईल.

३) सन २००९-१० च्या परीक्षांमध्ये इयत्ता पहिली ते आठवी च्या वर्गातील शाळांनी घोषित केलल्या वार्षिक निकाल पत्रकात, ज्या विद्यार्थ्यांना अनुत्तीर्ण घोषित केले आहे, त्या सर्व विद्यार्थ्यांना सन २०१०-११ या शैक्षणिक वर्षात पुढील वर्गात प्रवेश देण्याचे आदेश संदर्भित दिनांक १० मे, २०१० च्या परिपत्रकान्वये दिले आहेत. संबंधित सर्व शिक्षणाधिकारी अशा प्रकारचे पुढील वर्गात प्रवेश दिल्याची खात्री करतील. ज्या शाळांनी शासन आदेशानुसार कार्यवाही केली नाही त्यांच्याविरुद्ध कठोर कारवाई करावी. कोणत्याही परिस्थितीत राज्यातील एकही विद्यार्थी अनुत्तीर्ण वा इतर कारणास्तव त्याच इयत्तेत ठेवला जाणार नाही वा शाळेतून काढून टाकता येणार नाही याची दक्षता घेण्यात यावी.

४) अनुत्तीर्ण दर्शविण्यात आलेला विद्यार्थी दुसऱ्या शाळेमध्ये प्रवेशासाठी गेल्यास त्याला पुढील वर्गात प्रवेश देणे त्या शाळेस बंधनकारक राहील.

३. हा शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या वेब साईटवर देण्यात आले असून त्याचा संगणक सांकेतांक क्र. २०१००६१६१८५५४५००१ आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

( ना. उ. रौराळे )
उप सचिव, महाराष्ट्र शासन

**प्रति,**
मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव,
मा. उप मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव,
मा. मंत्री (शालेय शिक्षण) यांचे खाजगी सचिव,
मा. मंत्री यांचे खाजगी सचिव, (सर्व)
मा. राज्यमंत्री (शालेय शिक्षण) यांचे खाजगी सचिव,
मा. राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव, (सर्व)
मा. मुख्यसचिव, यांचे स्वीय सहाय्यक ,
मा. प्रधान सचिव, (शालेय शिक्षण) यांचे स्वीय सहाय्यक,
सर्व प्रधान सचिव / सचिव, मंत्रालय, मुंबई
सर्व आयुक्त, महानगरपालिका
संचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, मंत्रालय, मुंबई
सर्व जिल्हाधिकारी
सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद
शिक्षण संचालक (प्राथमिक), महाराष्ट्र राज्य,पुणे.
शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण ),महाराष्ट्र राज्य,पुणे.
शिक्षण संचालक (प्रौढ शिक्षण), महाराष्ट्र राज्य,पुणे.
संचालक, महाराष्ट्र राज्य परिक्षा परिषद,पुणे.
संचालक, महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद,पुणे
संचालक, महाराष्ट्र राज्य पाठयपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ (बालभारती),पुणे.
अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, महाराष्ट्र राज्य,पुणे.
संचालक, महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षण परिषद, चर्नीरोड, मुंबई
सर्व विभागीय शिक्षण उपसंचालक
सर्व शिक्षणाधिकारी, (प्राथमिक / माध्यमिक / प्रौढ) जिल्हा परिषद
सर्व मुख्याधिकारी, नगरपालिका / नगरपरिषद
सर्व प्रशासन अधिकारी, नगरपरिषद / कटकमंडळे
शिक्षण निरिक्षक (दक्षिण /पश्चिम / उत्तर) बृहन्मुंबई
निवड नस्ती (प्राशि-१)